# प्रेसनोट

जा.क्र. पोउप-आ/वाहतूक/ 6340 /२०१८

पुणे शहर, दिनांक -२९/०७/२०१८

**विषय :- लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती निमित्त करण्यात आले वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत.**

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती निमीत्त दिनांक ०१.०८.२०१९ रोजी पुणे शहरातील विविध ठिकाणची स्थानिक मंडळे व राजकीय पक्ष कार्यकर्ते **लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुतळा, सारसबाग, पुणे** या ठिकाणी मिरवणूकीने येऊन पुष्पहार अर्पण करणार आहेत. त्याचप्रमाणे जेधे चौक ते सारसबाग दरम्यानचे बालाजी विश्वनाथ पथावर एकत्र जमत असतात. त्यावेळी वाहनचालकांची गैरसोय होऊ नये, सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी,पंकज देशमुख,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे स्वारगेट परिसरातील वाहतूक व्यवस्थेमधील बदला बाबत आदेश निर्गमित करीत आहे.

| अ.क्र. | बंद रस्ता | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १ | जेधे चौकातुन सारसबाग चौकाकडे वाहनांना जाणेस प्रवेश बंद करणेत येत आहे. | १) जेधे चौकाकडून सिंहगड रोडला जाण्यासाठी होल्गा चौक - मित्रमंडळ चौक - सावरकर चौक मार्गे सिंहगड रोडला जावे.<br>२) सिंहगड रोडकडून स्वारगेटकडे जाण्यासाठी सावरकर चौक - मित्रमंडळ चौक - व्होल्गा चौक- जेधे चौक या मार्गाचा वापर करावा. |
| २ | जेधे चौकातील वायजंक्शन (फ्लॉयओव्हर)वरुन सारगबागेकडे वाहनांना जाणेस प्रवेश बंद करणेत येत आहे | १)कात्रजकडुन सारसबागेकडे जाणा-या वाहनचालकांनी ब्रीजवरुन न जाता ब्रीजखालुन लक्ष्मीनारायण चौकातुन डावीकडे वळुन इच्छित स्थळी जावे. |
| ३ | वेगासेंटर ते सारसबाग पर्यंत ग्रेडसेपरेटर वाहनांना जाणेस प्रवेश बंद करण्यात येत आहे. | वेगासेंटर पासून घोरपडीपेठ उद्यान,राष्ट्रभुषण चौक पासून हिराबाग चौकाकडून इच्छित स्थळी जावे. |
| ४ | पुरम चौक ते जेधे चौक या रस्त्यावरील एकेरी मार्गात वाहनांना आवश्यकता नुसार सायंकाळी १७.०० ते २२.०० वा. पर्यंत शिथीलता देवुन दुहेरी प्रवेश देण्यात येईल. | |

सदर भागातील वाहतूक परिस्थिती नुसार आवश्यक ते बदल करण्यात येणार आहेत. तरी वाहनचालकांनी उपलब्ध पर्यायी मार्गांचा वापर करुन, वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.